# जिल्हा परिषद,अमरावती

## सामान्य प्रशासन विभाग

Email- dyceogadzpamt@gmail.com Phone No. 0721-2662012, 2662932 www.zpamravati-gov.in


जा.क्र.जि.प.अम/साप्रवि/परिषद / ५०५८ /२०२४ दिनांक १५/१०/२०२४

संदर्भ:-१. मा.भारत निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. ECI/PN/१४८/२०२४ दि.१५/१०/२०२४
२.मा.संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे पत्र क्र. वृत्तचित्र-२०२४/परिपत्रक/का-७/७१५ दि.१५/१०/२०२४

**परिपत्रक**

विधानसभा आदर्श आचारसंहिता २०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोग यांची संदर्भिय क्र.०१ चे प्रसिध्दीपत्रकान्वये पत्रकार परिषद व्दारे घोषित केला आहे. विधानसभा आदर्श आचारसंहिता दि१५/१०/२०२४ चे दु.३.३० वाजता आदर्श आचासंहिता लागू झालेली आहे.त्याअनुषंगाने आदर्श आचार संहितेचे काळात खाते प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी घ्यावयाची काळजीबाबत खालील प्रमाणे आपल्या निदर्शनास आणुन देण्यांत येत असून आदर्श आचार साहिंतेचे काटेकारपणे पालन करावे.

* आचार संहितेचे काळात कुठल्याही प्रकारची बदली पदस्थापना अथवा भरतीवर बंदी राहील
* आचार संहितेचे काळात प्रचारा संबधी राजकीय नेत्यांचे पोस्टर्स ,बॅनर ,भिंती पत्रके शासकीय इमारती, शाळा, अंगणवाडी, दवाखाने, पशुवैद्यकीय दवाखाने,ग्राम पंचायती व इतर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारती व मोकळया जागा या ठीकाणी लावू देवू नये असल्यास त्वरीत काढण्यात यावे अन्यथा सार्वजनिक नुकसान मालमत्ता प्रतिबंधक कायदा १९८४ व तसेच खाजगी व सरकारी मालमत्ता विद्रुपण कायदा १९९६ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.तसेच शासकीय मालमत्तेचा वापर प्रचारासाठी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
* आचार संहितेचे काळात राजकिय पक्ष, लोक प्रतिनिधी यांनी आयोजित केलेल्या बैठका, कार्यक्रम व प्रचारा मध्ये आपले अधिनस्त अधिकारी /कर्मचारी सहभागी होणार नाही या बाबत दक्षता घेवून योग्य सूचना दयाव्यात .
* जिल्हा प्रशासनाला निवडणूक कामकाजात सर्वतोपरि सहकार्य करणे,(कर्मचा-यांची, वाहनाची माहिती देणे व सेवाअधिग्रहीत केल्यास तात्काळ प्रतिसाद देणे )
* आचार संहितेचे काळात प्रचार मोहीम ,निवडणूक कार्य करण्यासाठी शासकीय वाहनाचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी .
* आचार संहितेचे काळात कार्यालयांतर्गत विविध योजना अंतर्गत कार्यक्रमांचे भुमिपूजन,उद्घाटन, शिलान्यास बाबतचे कार्यक्रम राजकीय पक्ष/ उमेदवारांचे हस्ते आयोजित करण्यात येवू नये .
* विश्राम गृहाचे आरक्षण निवासी उपजिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करण्यात येवू नये .
* जिल्हा परिषेदच्या मालकीच्या सर्व इमारती,रस्ते यावरील सर्व पक्षाच्या पदाधिका-याची छायाचित्रे अथवा योजनांच्या उदघाटनांचे बोर्ड काढून टाकणे किंवा झाकूण टाकण्याबाबत कार्यवाही करावी.
* कोणत्याही कर्मचा-याची अपरिहार्य कारणाशिवाय दिर्घ रजा मंजूर करण्यात येवू नये
* पूर्वी मंजूर झालेल्या किंवा सुरु असलेल्या योजना प्रशासकीय पातळीवर राबविण्यांत याव्यात परंतु अशा योजना राबवितांना मेळावे,सभा किंवा इतर माध्यमातून राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांचा सहभाग घेवू नये किंवा कोणत्याही पक्षाला त्यापासून प्रसिध्दी मिळेल अशा प्रकारे कोणतीही कृती करु नये .
* मेळघाट सारख्या अति दुर्गम भागातील तथा इतर भागातील मतदान केंद्राची यादी प्राप्त करुन घेवून त्या केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती तात्काळ करुन घ्यावी.

* मैदाना सारख्या सार्वजनिक जागा उपलब्ध करुन देताना निपक्ष:पणे व शाळेचा कालावधी पाहून व आदर्श आचार संहितचे उल्लंघन होणार नाही याची आयोजकांना दक्षता घेण्याबाबत सूचना द्याव्यात.
* आदर्श आचारसंहिता तसेच निवडणूक विषयी सर्व माहिती संकेत स्थळावर उपलब्ध आहे .
(mahasec.maharashtra.gov.in)

**संजीता महापात्र (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,अमरावती**

प्रति,

१. ------------------------------------------------------------सर्व खाते प्रमुख जि.प. अमरावती

२. गटविकास अधिकारी,पंचायत समिती ----------------------------सर्व

यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करिता रवाना.